MHST060000302002

## नि.दि.दा.क्र. १०९/२००२ मधील निशाणी क्र. ८८ खालील आदेश

प्रस्तुत अर्जाचे वाचन केले. सदर अर्जाला प्रतिवादी यांनी विरोध केलेला नाही. सदर दाव्याचा उद्धेश हा दावा मिळकत मोजणी करुन हद्दीच्या खुणा निश्चित करुन मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदर प्रकरणात वाद मिळकतीमधील प्रतिवादी यांचे बांधकाम असलेल्या मिळकतीत असलेल्या क्षेत्रात मोजणी क्षेत्रातील तज्ञ म्हणजेच उपअधीक्षक भुमि अभिलेख, माण यांच्यामार्फत मोजणी करणे न्यायोचित होणार आहे. सदर दाव्याचा गुण व दोषावर निपटारा होणेसाठी सदरची मोजणी केल्याशिवाय दावा मिळकतीची प्रत्यक्ष परिस्थिती समोर येणार नाही. याउलट, जर अर्ज मंजूर केला तर वाद मिळकतीसंदर्भात वादी व प्रतिवादी यांच्यामधील वाद कायमस्वरुपी मिटणार आहेत. सदर मोजणीसंदर्भातील सर्व खर्च करण्यास वादी तयार आहे. त्यामुळे वाद मिळकतीसंदर्भातील मुळ दस्ताऐवज पाहून मौजे दहिवडी येथील सि.स.क्र. १०१ व ९४ या मिळकतींची मोजणी करणे कायदेशीर होणार आहे. सदर दाव्याचा उद्धेश पाहता सदर मोजणी केल्यास प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. या उलट, प्रतिवादीने अर्जाला हरकत देखील घेतली नाही. प्राप्त परिस्थितीत अर्ज मंजूर करणे योग्य होणार आहे. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे–

**आ दे श**

१) प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) मा. उपअधीक्षक, भुमि अभिलेख, दहिवडी यांची मौजे दहिवडी येथील सि.स.क्र. १०१ व ९४ या मिळकतीची मोजणी करणेकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात येत आहे.

३) न्यायालयीन आयुक्त यांना निर्देश देण्यात येत आहे की, त्यांनी सि.स.क्र. १०१ व ९४ या मिळकतीची मोजणी करुन हद्दीच्या खुणा कायम करणेत याव्यात व सदर मिळकतीमध्ये प्रतिवादीने केलेले बांधकाम याबाबत नकाशामध्ये उल्लेख केल्याबाबतचा सुस्पष्ट अहवाल न्यायालयात दाखल करावा.

४) न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी आपला अहवाल नकाशासह दि. २५.०९.२०२४ रोजी किंवा त्यापुर्वी दाखल करावयाचा आहे.

५) वादीने मोजणीचा खर्च करावयचा आहे. तसेच, मोजणीसाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे मा. उपअधीक्षक, भुमि अभिलेख, दहिवडी यांना दयाव्यीत.

GANESH DINKAR PATIL
Digitally signed by GANESH DINKAR PATIL
Date: 2024.07.09 11:50:48 +0530

(ग. दि. पाटील)

दिनांक : ०८.०७.२०२४.

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, दहिवडी.

**-: Affirmation certificate :-**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | :- | A. N. Ombase, Steno Grade-3, |
| Name of the Court | :- | Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Dahiwadi, Tal. Man, Dist. Satara. |
| Date of judgment/order | :- | 08.07.2024 |
| Judgment/order signed by the Presiding Officer on | :- | 08.07.2024 |
| Date of judgment/order uploaded on | :- | 09.07.2024 |